आजचे पंचांग

शुक्रवार दि. १५ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, त्रयोदशी सकाळी ८-३२ पर्यंत नंतर चतुर्दशी शनिवारच्या पहाटे ५-१२ पर्यंत नंतर अमावास्या तिथी, दिवस नक्षत्र-अश्विनी रात्री ८-१५ पर्यंत
चंद्र रास - मेष, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — शुक्रवार, दि. १५ मे, २०२६ — वर्ष - १ — अंक - २२९ — पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### सीएनजीच्या दरात वाढ

**पुणे:** महागाईच्या झळा तीव्र होत असल्याचं आता दिसत आहे. खाद्य तेल, सिलिंडर आणि दुधाच्या दरात वाढ झाल्यानंतर आता सीएनजीदेखील महागला आहे. पुण्यापाठोपाठ मुंबईतही २ रुपयांनी प्रति किलोमागे वाढ केली असून त्याचा फटका ग्राहकांना बसणार आहे. महानगर गॅस लिमिटेडने सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. सीएनजीचे दर वाढल्याने भाडेवाढ देखील करावी अशी मागणी रिक्षा आणि टॅक्सी युनियनने केली आहे.

## सारांश वृत्त

### बिहार पोटनिवडणुकीत आरजेडीचा विजय

**अरा :** राष्ट्रीय जनता दल ने बिहारमधील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी ला मोठा धक्का देत भोजपूर-बक्सर विधान परिषद मतदारसंघाची जागा जिंकली आहे. गुरुवारी जाहीर झालेल्या निकालात आरजेडीचे उमेदवार सोनू कुमार राय यांनी एनडीए समर्थित उमेदवार कन्हैया साह यांचा ३४० मतांनी पराभव केला. कन्हैया साह हे दिवंगत नेते साह यांचे पुत्र आहेत. या पोटनिवडणुकीसाठी मंगळवारी मतदान पार पडले होते.

### रशियाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी घेतली पीएम मोदींची भेट

**नवी दिल्ली :** सर्गेई लावरोव यांनी गुरुवारी नरेंद्र मोदी यांची भेट घेत विविध द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. युक्रेनमधील संघर्ष आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण म्हणून पाहिले जात आहे. पंतप्रधान कार्यालय यांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, दोन्ही नेत्यांमध्ये भारत-रशिया संबंध, ऊर्जा सहकार्य, जागतिक सुरक्षा परिस्थिती तसेच बहुपक्षीय मंचांवरील सहकार्य यासंदर्भात विचारांचे आदानप्रदान झाले.

### भारतीयांवर कोणतेही निर्बंध नाहीत

**काठमांडू :** नेपाळ सरकारने भारतीय नागरिकांवर कोणतेही नवे प्रवास निर्बंध लागू करण्यात आले नसल्याचे स्पष्ट केले आहे. भारतीय पर्यटकांना नेपाळमध्ये प्रवेश करताना व्हिसा, कालमर्यादा किंवा अन्य अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या माध्यमांतील वृत्तांचे नेपाळने जोरदार खंडन केले आहे. नेपाळ पर्यटन मंडळ ने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात ही वृत्ते खोटी आणि निराधार असल्याचे म्हटले.

### ३६ कोटींहून अधिक मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी होणार

# देशभरात एसआयआर मोहीमेचा तिसरा टप्पा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारतीय निवडणूक आयोग यांनी महाराष्ट्रासह देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) मोहीम राबवण्याची घोषणा केली आहे. मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली असून देशभरात तिची सुरुवात २० मे २०२६ पासून होणार आहे. महाराष्ट्रात ही प्रक्रिया २० जूनपासून सुरू होणार असल्याची माहिती आयोगाने दिली.

या मोहिमेदरम्यान नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, तसेच मतदारांच्या तपशीलातील चुका दुरुस्त करण्याचे काम केले जाणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पंजाब, मणिपूर आणि उत्तराखंड यांसारख्या राज्यांमध्ये ही मोहीम विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, एसआयआरच्या हा तिसरा टप्पा असून तो देशभर टप्प्याटप्प्याने राबवला जाणार आहे. या मोहिमेसाठी सुमारे ३.९४ लाख बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) आणि ३.४२ लाख बूथ लेव्हल एजंट्स (बीएलए) कार्यरत राहणार आहेत. देशभरातील सुमारे ३६.७३ कोटी मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. यापूर्वीच्या दोन टप्प्यांमध्ये तब्बल ५९ कोटी मतदारांचे पुनरीक्षण पूर्ण करण्यात आले आहे. महाराष्ट्रात या विशेष मोहिमेअंतर्गत ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर दावे आणि हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होईल. सर्व सुनावण्या आणि पडताळणीनंतर अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, महाराष्ट्रात २० जून ते २९ जूनदरम्यान तयारी, प्रशिक्षण आणि छपाईची प्रक्रिया पार पडेल. ३० जून ते २९ जुलैदरम्यान बीएलओंकडून घरभेटी घेण्यात येतील. मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण २९ जुलैपर्यंत पूर्ण केले जाईल. ५ ऑगस्टला मसुदा यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती स्वीकारल्या जातील. त्यावरील सुनावणी आणि निर्णय प्रक्रिया ३ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून १ ऑक्टोबर हा पात्रता दिनांक निश्चित करण्यात आला आहे.

महाराष्ट्रासह ओडिशा, मिझोरम, सिक्कीम, मणिपूर, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, तेलंगणा, पंजाब, कर्नाटक, मेघालय, झारखंड, दिल्ली, नागालँड, त्रिपुरा तसेच दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव या भागांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाखचा या टप्प्यात समावेश करण्यात आलेला नाही.

दरम्यान, मतदारांनी आपले नाव, पत्ता आणि इतर माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, तसेच आवश्यक दुरुस्त्या वेळेत करून घ्याव्यात, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

## सुनील शेळकेंच्या दाव्याने खळबळ रोहित पवार काँग्रेसमध्ये जाणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** रोहित पवार हे लवकरच काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. बारामतीच्या राजकारणात आणि पवार कुटुंबातील अंतर्गत समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याच्या चर्चा या दाव्यानंतर पुन्हा रंगू लागल्या आहेत.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना सुनील शेळके यांनी दावा केला की, रोहित पवार हे काँग्रेसच्या संपर्कात असून आगामी काळात ते मोठा राजकीय निर्णय घेऊ शकतात. यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमधील अलीकडील अंतर्गत घडामोडी, पक्ष संघटनेतील बदल आणि काही नेत्यांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर या दाव्याकडे महत्त्वाने पाहिले जात आहे.

रोहित पवार यांनी यापूर्वीच अजित पवार गटातील काही नेते भविष्यात भाजपच्या तिकिटावर निवडणुका लढवतील, असा दावा केला होता. त्यांनी विशेषतः सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासह २२ आमदार भाजपच्या संपर्कात असल्याचे म्हटले होते. या विधानामुळे राष्ट्रवादीतील संघर्ष अधिकच उघडपणे समोर आला होता. रोहित पवारांच्या दाव्याला प्रत्युत्तर देताना सुनील तटकरे यांनीही जोरदार पलटवार केला. "रोहित पवार यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. उलट ते स्वतः भाजपमध्ये जाण्यास इच्छुक होते," असे विधान तटकरेंनी केले आहे. या सर्व चर्चांमध्ये अधिकृतरीत्या रोहित पवार किंवा काँग्रेसकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

## तामिळनाडूत सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू सरकारने सरकारी कर्मचारी, शिक्षक आणि पेन्शनधारकांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेत महागाई भत्यात २ टक्क्यांची वाढ जाहीर केली आहे. यानुसार महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून वाढवून ६० टक्के करण्यात आला असून, नवे दर १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना वाढीव पगारासह थकबाकीचाही लाभ मिळणार आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयाचा फायदा सुमारे १६ लाख सरकारी कर्मचारी, शिक्षक आणि निवृत्तिवेतनधारकांना होणार आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, यामुळे कर्मचाऱ्यांच्या आर्थिक भारात काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. गेल्या काही महिन्यांत खाद्यपदार्थ, इंधन, वाहतूक आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याने घरगुती बजेटवर ताण निर्माण झाला होता.

तामिळनाडू सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या हिताचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. महागाई भत्ता वाढीमुळे राज्याच्या तिजोरीवर सुमारे १,२३० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

### सरकारी खर्चावर लगाम; पुढील सहा महिने मोठे शासकीय सोहळे बंद

# फडणवीस 'बुलेट'वरून विधान भवनात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती आणि संभाव्य इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय जाहीर केला आहे. राज्यातील सर्व मोठे शासकीय कार्यक्रम पुढील सहा महिन्यांसाठी स्थगित करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी गुरुवारी केली.

सरकारी खर्चात कपात आणि इंधन बचत या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "नेत्यांनी केवळ उपदेश न करता स्वतः कृतीतून आदर्श निर्माण केला पाहिजे. तेव्हाच संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचतो," असे सांगत फडणवीस यांनी या निर्णयाचे समर्थन केले.

दरम्यान, विधान परिषदेतील नवनिर्वाचित १० आमदारांच्या शपथविधी कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस स्वतः 'बुलेट' मोटारसायकलवरून विधान भवनात दाखल झाले. त्यांच्या मागे मंत्री आशिष शेलार बसले होते. इंधन बचतीचा संदेश प्रतीकात्मक पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांवर टीका करणाऱ्या विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. "पंतप्रधानांचे परदेश दौरे हे देशाच्या अर्थव्यवस्था, गुंतवणूक आणि धोरणात्मक हितासाठी आवश्यक असतात. अशा दौऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे म्हणजे अपरिपक्वतेचे लक्षण आहे," असे ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, पुढील सहा महिन्यांत नवीन मोठे सरकारी सोहळे आयोजित केले जाणार नसले तरी सातत्यात शुक्रवारी होणारा कार्यक्रम नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. "या कार्यक्रमाचे नियोजन आधीच पूर्ण झाले असून त्यावर खर्चही करण्यात आला आहे. या कार्यक्रमाद्वारे 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गत २५ लाख कुटुंबांना सुमारे १० हजार कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे तो रद्द करणे योग्य ठरणार नव्हते," असे त्यांनी सांगितले.

फडणवीस यांनी विरोधकांवर टीका करताना म्हटले की, "आज जगातील अनेक देश कठोर आर्थिक निर्णय घेत आहेत. पंतप्रधानांनी नागरिकांना केवळ थोडासा त्याग करण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी इंदिरा गांधी यांच्या काळात आणि २०१२ मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनीही अशाच प्रकारचे उपाय सुचवले होते. देशहितासाठी थोडे जुळवून घेण्याची तयारी न दाखवणे ही विरोधकांच्या प्रगल्भतेची उणीव आहे."

### एमएमआरमध्ये उभारणार 'ग्रीन डेटा सेंटर पार्क'; ८ हजार रोजगार निर्मिती

# महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची एआय गुंतवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला नवी चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग आणि एमएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात तब्बल १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे राज्यात सुमारे ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या करारावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, कंपनीचे अध्यक्ष अनिल चलमलशेट्टी, संचालक मौर्य पायदा आणि उपाध्यक्ष पंकज कुमार उपस्थित होते.

या करारांतर्गत मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) अत्याधुनिक 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकल्प अक्षय ऊर्जेवर आधारित असेल. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासह डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासालाही चालना मिळणार आहे. या प्रकल्पातून उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. सॉफ्टवेअर अभियंते, डेटा सायंटिस्ट, नेटवर्क व्यवस्थापन, ऑपरेशन्स आणि तांत्रिक सहाय्यक अशा विविध क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती होणार असून, प्रकल्पाच्या बांधकाम काळात अतिरिक्त २ हजार रोजगार उपलब्ध होतील.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असणार असून त्यात सुमारे २ लाख ५० हजार उच्च क्षमतेचे एआय चिपसेट्स वापरण्यात येणार आहेत. प्रकल्पाचा विकास दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २०० मेगावॅट क्षमतेचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, तर दुसरा ३०० मेगावॅट क्षमतेचा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण केला जाणार आहे.

राज्य सरकारच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ आणि हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत हा प्रकल्प विकसित केला जाणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा या प्रकल्पामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

## 'नीट'च्या आवश्यकतेवर राज ठाकरेंचा सवाल

**मुंबई :** राज ठाकरे यांनी 'नीट' परीक्षेच्या आवश्यकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. पेपरफुटीच्या आरोपांनंतर परीक्षा रद्द करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राज ठाकरे यांनी केंद्र सरकारच्या केंद्रीकरणाच्या धोरणावर निशाणा साधला. "सर्व काही एका केंद्रीकृत यंत्रणेच्या अखत्यारित आणण्याचे सरकारला इतके वेड लागले आहे की, त्यातून लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य विस्कळीत झाले तरी त्यांना काही फरक पडत नाही," अशी टीका त्यांनी केली.

# केजरीवालांविरोधात अवमान कारवाई

### न्यायमूर्ती स्वर्णकांत शर्मा संतप्त; "मी गप्प बसू शकत नाही"

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालय येथील न्यायमूर्ती स्वर्णकांत शर्मा यांनी गुरुवारी अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि आम आदमी पक्ष च्या इतर वरिष्ठ नेत्यांविरोधात अवमान कारवाई सुरू केली.

मद्य धोरण प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालय आणि न्यायाधीशांविरोधात अपमानास्पद आणि बदनामीकारक सामग्री प्रसारित झाल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती शर्मा म्हणाले, "माझ्या लक्षात आले आहे की काही प्रतिवादींनी माझ्याविरोधात आणि या न्यायालयाविरोधात अत्यंत अपमानास्पद व अवमानकारक सामग्री प्रसारित केली आहे. मी यावर गप्प बसू शकत नाही."

त्यांनी काही प्रतिवादी आणि अन्य संबंधितांविरोधात अवमान कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. ही सुनावणी केंद्रीय अन्वेषण विभागाने दाखल केलेल्या त्या याचिकेवर सुरू होती, ज्यामध्ये कनिष्ठ न्यायालयाने मद्य धोरण प्रकरणात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि अन्य २१ जणांना दिलेल्या आरोपमुक्तीला आव्हान देण्यात आले आहे. यापूर्वी न्यायालयाने प्रतिवादींच्या बाजूने वरिष्ठ वकिलांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता.

मात्र, सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती शर्मा यांनी सांगितले की, काही वरिष्ठ वकिलांनी न्यायालयाची शिफारस स्वीकारली असली तरी दरम्यान त्यांना अवमानकारक सामग्री आढळली.

दरम्यान, हितसंबंधांचा संघर्ष आणि पक्षपातीपणाच्या भीतीचा आरोप करत अरविंद केजरीवाल आणि इतर आमदारांनी न्यायमूर्ती शर्मा यांच्यासमोरील सुनावणीवर बहिष्कार टाकला आहे.

### ३७,५०० कोटींच्या योजनेला मंजुरी; ५० हजार रोजगार निर्माण होणार

# कोळशापासून कार्बन नाही, तर गॅसिफिकेशन...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळ यांनी देशातील कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांसाठी ३७,५०० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी योजनेला मंजुरी दिली आहे. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या योजनेमुळे २०३० पर्यंत १०० दशलक्ष टन कोळशाचे गॅसिफिकेशन करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला गती मिळणार असून देशाची ऊर्जा सुरक्षितता अधिक मजबूत होणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती देताना सांगितले



की, भारतात मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या दगडी कोळशाचा वापर करून गॅस निर्मिती करण्यासाठी सरकार दीर्घकाळ प्रयत्न करत होते. त्या दिशेने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. कोळसा गॅसिफिकेशन प्रक्रियेमध्ये कोळशापासून 'सिंथेसिस गॅस' अर्थात 'सिंगॅस' तयार केला जातो. हा कार्बन मोनॉक्साइड आणि हायड्रोजन यांचे मिश्रण असतो. या गॅसचा वापर नैसर्गिक वायूप्रमाणे करता येतो. तसेच सिंगॅसपासून एलपीजीसदृश गॅस, रासायनिक खते, मिथेनॉल, अमोनिया आणि विविध पेट्रोलियम पदार्थ तयार करता येतात. त्यामुळे ऊर्जा, खत आणि रसायन उद्योगासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

सिंगॅस उत्पादनाद्वारे कोळसा गॅसिफिकेशन" प्रकल्पांसाठी नॉन-रेग्युलेटेड सेक्टर लिंकज लिलाव योजनेंतर्गत कोळसा पुरवठा कराराचा कालावधी ३० वर्षांपर्यंत वाढवला आहे. यामुळे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन स्थैर्य मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत नव्या सरफेस कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी एकूण ३७,५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यातून सुमारे ७५ दशलक्ष टन कोळसा किंवा लिग्नाइटचे गॅसिफिकेशन करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. प्रकल्पांची निवड पारदर्शक आणि स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे केली जाणार असून प्रकल्प खर्च, कोळसा वापर आणि सिंगॅस उत्पादन या निकषांवर मूल्यमापन होईल.

प्रोत्साहनाची रक्कम चार टप्प्यांमध्ये वितरित केली जाईल. एका प्रकल्पासाठी जास्तीत जास्त ५ हजार कोटी रुपयांपर्यंत प्रोत्साहन मिळू शकणार आहे. तर एका उद्योग समूहाला एकूण १२ हजार कोटी रुपयांपर्यंत लाभ मिळू शकेल. या योजनेमुळे देशात सुमारे २.५ ते ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित होऊ शकते. भारत सध्या एलएनजी, युरिया, अमोनिया आणि मिथेनॉलसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. कोळसा गॅसिफिकेशनमुळे ही आयात कमी होण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पांमुळे कोळसा उत्पादक भागांमध्ये सुमारे २५ नवीन प्रकल्प उभारले जाण्याची शक्यता असून त्यातून थेट आणि अप्रत्यक्ष मिळून सुमारे ५० हजार रोजगार निर्माण होतील. यापैकी चार प्रकल्पांचे काम आधीच सुरू झाल्याची माहितीही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

## पुण्यातील महिलेच्या बँक खात्यांत लाखोंची उलाढाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात आता मोठ्या आर्थिक व्यवहारांचे धक्कादायक धागेदोरे समोर येऊ लागले आहेत. पुण्यातून ताब्यात घेण्यात आलेल्या मनिषा वाघमारे हिच्या तब्बल २१ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये लाखो रुपयांची रक्कम जमा झाल्याची माहिती सीबीआयच्या तपासातून समोर आली आहे. या खात्यांमध्ये जमा झालेली रक्कम प्रश्नपत्रिका विक्री किंवा संबंधित व्यवहारांसाठी आगाऊ स्वरूपात घेतल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

सीबीआय अधिकाऱ्यांकडून पुण्यात मनिषा वाघमारे हिची सकाळपासून कसून चौकशी सुरू असून, तिचे आणि या प्रकरणातील प्रमुख संशयित धनंजय लोखंडे यांच्यातील टेलिग्राम आणि व्हॉट्सॲपवरील संभाषण तपास यंत्रणांच्या हाती लागले आहे. तपासादरम्यान, नीट परीक्षेपूर्वी काही दिवसांत विविध खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे जमा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रश्नपत्रिका मिळवून देण्यासाठी ॲडव्हान्स रक्कम उकळण्यात आली होती का, याचा तपास सुरू आहे. या २१ खात्यांचे वास्तविक मालक कोण आहेत, पैसे नेमके कुठून आले आणि कोणाकडे पाठवले गेले, याचा तपशील सीबीआय शोधत आहे.

## संपादकीय

# डॉलरची गळती आणि भविष्यातील 'तेल'धक्के!



**कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी संभाव्य वाढ आणि जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, परकीय चलन साठा वाचवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने उचललेली पावले ही केवळ तांत्रिक नसून ती भारतीय अर्थव्यवस्थेला लागणाऱ्या 'महागाईच्या' धक्क्यापासून वाचवणारी संरक्षक कवचकुंडे आहेत.**

जागतिक अर्थकारणाच्या अथांग समुद्रात जेव्हा जेव्हा भूराजकीय वादाचे वारे वाहू लागतात, तेव्हा रुपयाच्या नावेला स्थिर ठेवण्याचे कसब मुंबईतील मिंट रोडवर बसलेल्या धोरणकर्त्यांना पणाला लावावे लागते. 'इंधन' हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा आणि जुना कमकुवत दुवा आहे, हे आता काही नव्याने सांगण्याची गरज उरलेली नाही. मात्र, सध्याच्या घडीला ज्या पद्धतीने रिझर्व्ह बँकेने डॉलरची बाह्य गळती रोखण्यासाठी कंबर कसली आहे, त्यावरून एक गोष्ट लख्खपणे स्पष्ट होते की, आगामी तेलधक्क्यांची तीव्रता आपण कल्पिलेल्यापेक्षा अधिक तीव्र आणि दीर्घकालीन असू शकते. धोरणात्मक बचावात्मकता ही अनेकदा मोठ्या संकटाची पूर्वसूचना असते, हे रिझर्व्ह बँकेच्या या पावलांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. भारताच्या परकीय चलन साठ्यातून डॉलरचा ओघ बाहेर जाणे ही चिंतेची बाब यासाठी आहे की, आपण आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक भाग आयात करतो. जेव्हा जागतिक बाजारात डॉलर वधारतो आणि रुपयाची घसरगुंडी सुरू होते, तेव्हा केवळ तेलच महाग होत नाही, तर त्यासोबत येणारी आयातित महागाई संपूर्ण अर्थव्यवस्थेला आपल्या विळख्यात घेते. रिझर्व्ह बँकेचा सध्याचा 'प्रुडंट' म्हणजेच विवेकी पवित्रा हा याच गळतीला खिळ घालण्यासाठी आहे. भांडवली बाजारातून परकीय गुंतवणूकदारांची होणारी सातत्यपूर्ण माघार आणि आयातीचे फुगलेले बिल यामुळे डॉलरची मागणी वाढली असून, रुपयावरचा ताण दिवसागणिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, आरबीआयने डॉलरच्या उपलब्धतेबाबत जे निर्बंध किंवा मार्गदर्शक तत्त्वे आखली आहेत, ती एका मोठ्या 'आर्थिक सर्जिकल स्ट्राइक'ची पूर्वतयारी आहे. आपण रशियाकडून स्वस्त तेल घेऊन मधल्या काळात डॉलर वाचवण्याचे जे काही 'धाडस' केले होते, त्याला आता जागतिक राजकारणाच्या मर्यादा येऊ लागल्या आहेत. रशियन तेलाची सवलत कमी होणे आणि दुसरीकडे इराण-इस्रायल संघर्षामुळे होर्मुझच्या समुद्रधुनीतील तणाव वाढणे, यामुळे पुरवठा साखळीवर आलेला ताण हा तेलाच्या किमतींना पुन्हा एकदा 'शंभरीपार' नेण्यासाठी टपलेला आहे. अशा वेळी आपल्याकडे पुरेसा डॉलर साठा असणे ही केवळ चैन नसून ती देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वासाठी जगण्याची गरज बनली आहे. प्रश्न हा आहे की, आपण आपल्या परकीय चलनाचे व्यवस्थापन करताना किती काळ केवळ आयातीवर नियंत्रण मिळवणार? आपली निर्यात अपेक्षित वेगाने वाढत नसल्याने चालू खात्यावरील तूट ही नेहमीच धगधगती असते. जेव्हा जेव्हा जागतिक मंदीची चाहूल लागते किंवा अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'कडून व्याजदरांबाबत कठोर भूमिका घेतली जाते, तेव्हा सुरक्षित गुंतवणूक म्हणून डॉलरकडे पाहण्याचा ओघ वाढतो. या 'फ्लाईट टू सेफ्टी'च्या खेळात रुपयाचे मूल्य टिकवणे हे रिझर्व्ह बँकेसाठी नेहमीच तारेवरची कसरत ठरते. प्रशासकीय आणि धोरणात्मक अंगाने विचार केला तर, सरकारने केवळ रिझर्व्ह बँकेवर सर्व भार सोपवून मोकळे होणे चुकीचे ठरेल. राजकोषीय आघाडीवर शिस्त पाळणे ही सरकारची जबाबदारी आहे. अनुदानांचा वाढता बोजा आणि निवडणुकांच्या राजकारणात दिली जाणारी आश्वासने यांचा थेट परिणाम तिजोरीवर होत असतो. डॉलरचा साठा वेगाने आटला, तर आपल्याला पुन्हा एकदा १९९१ सारख्या संकटाची आठवण करून देणारे दिवस पाहावे लागतील, अशी भीती व्यक्त करणे जरी आज अनेकांना अतिशयोक्तीचे वाटले, तरी इतिहासापासून धडा न घेणारी राष्ट्रेच अशा संकटात अधिक होरपळतात, हे आपण विसरता कामा नये. डॉलरची ही गळती रोखण्याचा आणि आयातीवर नियंत्रण मिळवण्याचा निर्णय हा केवळ आजचा दिवस वाचवण्यासाठी नाही, तर उद्याच्या अनिश्चिततेसाठी बांधलेला एक भक्कम बांध आहे. अशा धुसर परिस्थितीत परकीय चलनाचा हा साठा 'बफर' म्हणून काम करेल. अर्थव्यवस्थेच्या गाडीला प्रगतीचे इंधन लागतेच, पण ते इंधन विकत घेण्यासाठी लागणारे 'चलन' जर आपल्याकडे नसेल, तर प्रगतीचा महामार्ग हा केवळ कागदी स्वप्न ठरेल. रिझर्व्ह बँकेने वेळीच ओळखलेला हा धोका आणि त्यावरील या कठोर उपाययोजना हेच आता भारतीय अर्थव्यवस्थेचे तारणहार ठरणार आहेत, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे.

# परीक्षेचा बाजार आणि विश्वासाचा निघृण बळी!

**» वैद्यकीय प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या 'नीट' परीक्षेतील गोंधळ, पेपरफुटीची लागण आणि त्या तुलनेत 'जेईई'ची असलेली अभेद्यता, हे शैक्षणिक व्यवस्थेतील सडकेपणा आणि प्रशासकीय हतबलतेचेच दर्शन घडवते.**




देशातील लाखो विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे डोळे ज्या दोन प्रमुख परीक्षांच्या निकालाकडे लागलेले असतात, त्या म्हणजे 'नीट' आणि 'जेईई'. मात्र, गेल्या काही वर्षांचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे 'नीट' ही परीक्षा वादाच्या, संशयाच्या आणि पेपरफुटीच्या चिखलात सतत रुतलेली असते; तर 'जेईई' ही परीक्षा तुलनेने अधिक सुरक्षित आणि पारदर्शक मानली जाते. नॅशनल टेस्टिंग एजन्सी या एकाच छताखाली दोन्ही परीक्षा घेतल्या जात असतानाही, 'नीट'च्याच नशिबी हा 'भ्रष्टाचाराचा शाप' का, याचा वेध घेणे आता अनिवार्य झाले आहे.

या दोन्ही परीक्षांमधील सर्वात मूलभूत आणि कळीचा फरक हा त्यांच्या 'पॅटर्न'मध्ये दडलेला आहे. 'नीट' ही आजही 'पेन आणि पेपर' या कालबाह्य आणि पारंपरिक पद्धतीने, म्हणजेच ऑफलाईन घेतली जाते. याउलट 'जेईई' ही पूर्णपणे संगणकीकृत पद्धतीने पार पडते. तांत्रिक दृष्टिकोनातून पाहिले तर, ऑफलाईन परीक्षेसाठी लाखो प्रश्नपत्रिकांची छपाई, त्यांची ट्रकने होणारी वाहतूक, बँकांच्या लॉकरमधील साठवणूक आणि केंद्रांवरील वाटप या प्रक्रियेत मानवी हस्तक्षेपाची एक मोठी साखळी असते. जिथे मानवी हस्तक्षेपाचे इतके टप्पे असतात, तिथे भ्रष्टाचाराच्या वाळवीला शिरकाव करणे सोपे जाते. "साखळी जितकी मोठी, तितका तिचा कच्चा दुवा शोधणे सोपे", हे 'नीट'च्या माफियांचे साधे गणित आहे.

दुसरीकडे, 'जेईई'मध्ये प्रश्नपत्रिका थेट परीक्षा सुरू होण्यापूर्वी काही मिनिटे आधी डिजिटल स्वरूपात सर्व्हरवरून केंद्रावर उपलब्ध होतात. तिथे ट्रकने पेपर वाहून नेण्याचे किंवा छपाईच्या ठिकाणी खिंडार पाडण्याचे धाडस कुणी करू शकत नाही. मग प्रश्न असा पडतो की, जर आपण जगाला आयटी सेवा पुरवतो, तर आपल्याच देशातील २४ लाख विद्यार्थ्यांची वैद्यकीय प्रवेश परीक्षा आपण डिजिटल का करू शकत नाही?

'नीट'ची व्याप्ती आणि तिची 'एकवेळची संधी' हा यातील दुसरा मोठा पेच आहे. 'नीट' ही वर्षातून एकदाच आणि एकाच वेळी घेतली जाते. देशभरातील २४ लाख विद्यार्थी एकाच तीन तासांच्या खिडकीत आपले भविष्य अजमावतात. अशा वेळी जर एका केंद्रावरही पेपर फुटला, तर त्याचे पडसाद संपूर्ण देशात उमटतात. याउलट, 'जेईई' ही वर्षातून दोनदा आणि अनेक दिवसांच्या वेगवेगळ्या सत्रांत घेतली जाते. प्रत्येक सत्रासाठी प्रश्नपत्रिकांचा संच वेगळा असतो. यामुळे पेपर विकणाऱ्यांचे आणि घेणाऱ्यांचे 'बाजार मूल्य' कोसळते. कारण एका सत्राचा पेपर फोडून संपूर्ण निकालावर परिणाम करणे अशक्य असते. 'नीट'च्या बाबतीत असलेल्या या 'मर्यादित संधी'मुळेच कोचिंग माफिया आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे फावते आहे. प्रशासकीय अंगाने विचार केला तर, 'नीट'च्या ऑफलाईन पद्धतीमुळेच देशभरातील कोचिंग माफियांचे आणि 'एजंट्स'चे जाळे अधिक घट्ट झाले आहे. प्रश्नपत्रिका छापण्यापासून ते केंद्रापर्यंत पोहोचेपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर हे माफिया आपली सर्व शक्ती पणाला लावून व्यवस्थेला सुरुंग लावतात. मुळात, वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशासाठी असलेली जीवघेणी स्पर्धा आणि त्यातून निर्माण झालेला अवाढव्य 'पैसा' हा या सर्व पापांचा मूळ स्रोत आहे. पेपरफुटी झाल्यानंतर केवळ एफआयआर नोंदवणे किंवा समिती नेमणे, ही मूळ व्याधीवरची मलमपट्टी आहे. आजची परिस्थिती अशी आहे की, प्रामाणिकपणे दिवसरात्र अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला जेव्हा कळते की, त्याचे भवितव्य भ्रष्ट व्यवस्थेने आधीच लिलावात काढले आहे, तेव्हा त्या विद्यार्थ्याच्या आत्मविश्वासाचा आणि पर्यायाने लोकशाही मूल्यांचाही बळी जातो. जर आपण 'जेईई' सारखी जटिल आणि बहुस्तरीय परीक्षा यशस्वीपणे पार पाडू शकतो, तर 'नीट'ला डिजिटल सुरक्षेचे कवच देण्यास नक्की कोणाचा विरोध आहे? कागदी प्रश्नपत्रिकांचा मोह हा केवळ प्रशासकीय सोयीसाठी आहे की भ्रष्टाचाराची दारे उघडी ठेवण्यासाठी, असा संशय आता बळावू लागला आहे.

प्रश्न केवळ एका परीक्षेचा नसून तो देशाच्या आरोग्य व्यवस्थेच्या भविष्याचा आहे. जे डॉक्टर भ्रष्ट मार्गाने आणि पेपर विकत घेऊन व्यवस्थेत शिरणार आहेत, ते उद्या रुग्णांच्या जीवाशी खेळणार नाहीत कशावरून? 'नीट'ला 'जेईई'च्या धर्तीवर संगणकीकृत करणे, परीक्षेच्या अनेक संधी उपलब्ध करून देणे आणि मानवी हस्तक्षेप किमान स्तरावर आणणे, हेच आता एकमेव मार्ग उरले आहेत. अन्यथा, या 'परीक्षांच्या बाजारात' केवळ प्रश्नपत्रिकाच विकल्या जाणार नाहीत, तर देशाची विश्वासार्हताही कायमची लिलावात निघेल. सत्तेच्या उबदार खुर्च्यांवर बसलेल्यांनी विद्यार्थ्यांच्या या आक्रोशाची दखल आता तरी घ्यावी, हीच अपेक्षा.

# ऊर्जा बचत धोरणाबाबत पीसीएमसी महापालिकेची बैठक

## प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन वीज वापरात बचतीचे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक बुधवारी मुख्य प्रशासकीय भवनात पार पडली. ऊर्जा बचतीसंदर्भातील उपक्रम केवळ अहवाल, अभ्यास आणि सादरीकरणांपुरते मर्यादित न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन वीज वापरात लक्षणीय बचत दिसून आली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी दिले.



महापालिकेच्या प्रशासकीय इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करून वीज बचत, खर्च नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन साध्य करण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत एसी यंत्रणा, वॉटर पंप तसेच विविध विद्युत उपकरणांच्या ऊर्जा वापराचे व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे उपस्थित होते. तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक (एडीबी), अलायन्स फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (एईईई) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू) या संस्थांचे प्रतिनिधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

महापालिकेने यापूर्वी अलायन्स फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमीसोबत सामंजस्य करार केला असून, त्याअंतर्गत एडीबी आणि सीईईडब्ल्यूसह संयुक्तपणे ऊर्जा कार्यक्षमतेसंदर्भातील अभ्यास आणि नियोजन प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत महापालिकेच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण, ऊर्जा बचतीच्या संधी, आर्थिक व्यवहार्यता आणि निधी संरचना यासंबंधी विविध टप्प्यांमध्ये काम सुरू आहे. बैठकीत इन्सेप्शन रिपोर्ट, ऊर्जा खर्च विश्लेषण अहवाल, प्राथमिक आर्थिक मॉडेल, व्यवसाय आराखडा, निधी संरचना अहवाल, प्री-फिजिबिलिटी स्टडी तसेच अंतिम आर्थिक मॉडेल यांचे संगणकीय सादरीकरण करण्यात आले. ऊर्जा बचतीच्या उपाययोजनांसाठी आवश्यक गुंतवणूक, निधी उभारणीची पद्धत आणि अंमलबजावणीची कार्यपद्धती यावरही बैठकीत चर्चा झाली. ऊर्जा कार्यक्षम प्रकल्प राबविताना दीर्घकालीन शाश्वतता, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रत्यक्ष ऊर्जा बचतीचे मोजमाप यावर विशेष भर देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

"ऊर्जा बचत ही केवळ आर्थिक गरज नसून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. महापालिकेच्या इमारतींमध्ये आधुनिक ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करून वीज खर्चात बचत करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे," असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# पंतप्रधानांचे आवाहन हे राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत असून त्याची झळ भारतासारख्या विकसनशील देशांनाही बसत आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सोने-चांदी खरेदी, पेट्रोल-डिझेल आणि खाद्यतेलाच्या वापराबाबत संयम बाळगण्याचे केलेले आवाहन हे केवळ आर्थिक नव्हे, तर राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक असल्याचे मत राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले. पिंपरी येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, खाद्यतेल आणि सोन्याच्या आयातीवर अवलंबून आहे. युद्धजन्य परिस्थितीत अमेरिकन डॉलर मजबूत होत असल्याने रुपयाची किंमत घसरते आणि आयात खर्च वाढतो. परिणामी पेट्रोल-डिझेलचे दर वाढून महागाईचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो.

डिझेलच्या वाढत्या दरामुळे ट्रॅक्टर, पंप, शेती मशागत आणि मालवाहतुकीचा खर्च वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे भाजीपाला आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाढत्या उष्णतेमुळे वीज यंत्रणेवर येतोय ताण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** सध्या तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेल्याने सांगवी आणि पिंपळे गुरव परिसरातील विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाढत्या उष्णतेमुळे रहाटणी येथील मुख्य वीज उपकेंद्रावरील ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार पडत असून, यंत्रणा ओव्हरलोड होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. तांत्रिक बिघाड आणि वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका लक्षात घेता महावितरणने नागरिकांना वीज काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले आहे.



सांगवी परिसरात वारंवार उद्भवणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामागे १५ वर्षांहून अधिक जुन्या झालेल्या भूमिगत केबल्स हे प्रमुख कारण असल्याचे समोर आले आहे. शहरात सिमेंट रस्त्यांची कामे करताना भूमिगत वीजवाहिन्यांचा पुरेसा विचार न झाल्याने अनेक केबल्स सिमेंटच्या थराखाली दडल्या गेल्या आहेत. या जुन्या केबल्समध्ये बिघाड झाल्यानंतर तो शोधणे आणि दुरुस्त करणे महावितरणच्या तांत्रिक पथकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. परिणामी शितोळेनगर, मधुबन सोसायटीसह अनेक भागांमध्ये नागरिकांना तासनतास अंधाराचा सामना करावा लागत आहे.

शितोळेनगर आणि मधुबन सोसायटी परिसरातील वीजपुरवठा समस्येची दखल घेत महावितरणने जुना केबल नेटवर्क बदलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. नवीन केबल टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून ते लवकर पूर्ण होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, केवळ एका भागापुरते हे काम मर्यादित न ठेवता संपूर्ण सांगवी परिसरातील जुन्या केबल्सचे सर्वेक्षण करून त्यांची टप्प्याटप्प्याने बदली करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

महावितरणकडून नागरिकांना वीज बचतीचे आवाहन करण्यात येत असताना प्रशासनानेही पायाभूत वीज यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. वाढती लोकसंख्या, वाढलेली विजेची मागणी आणि जुनाट यंत्रणा यामुळे भविष्यातील समस्या टाळण्यासाठी कायमस्वरूपी नियोजनाची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. "वाढत्या उष्णतेमुळे ट्रान्सफॉर्मरवर प्रचंड भार येत आहे. तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी नागरिकांनी विजेचा अपव्यय टाळून सहकार्य करावे," असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# गॅस बिल अपडेटच्या नावाखाली सायबर फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** चिखली परिसरात गॅस बिल अपडेट करण्याच्या बहाण्याने एका नागरिकाची ऑनलाईन फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात सायबर गुन्हेगारांनी मोबाईल हॅक करून तब्बल १ लाख ५८ हजार ८०० रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतले. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना "एमएनजीएल गॅस कनेक्शन बंद होणार असून तात्काळ बिल भरा" असा मेसेज आला होता. संबंधित मेसेजमध्ये पाठविण्यात आलेल्या फाइलवर क्लिक करून फिर्यादींनी गॅस बिल




४९ हजार, ४९ हजार ८००, ५० हजार आणि १० हजार रुपये असे टप्प्याटप्प्याने एकूण १ लाख ५८ हजार ८०० रुपये ऑनलाईन लंपास केले.

ही घटना ६ मे ते ७ मे २०२६ दरम्यान नेवाळे वस्ती, चिखली येथे घडली. याप्रकरणी १२ मे रोजी चिखली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१६(२), ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साळुंखे करीत आहेत.

सायबर तज्ज्ञांनी नागरिकांना अनोळखी लिंक, एपीके फाइल किंवा मेसेजवरील कोणतीही लिंक क्लिक करण्यापूर्वी खातरजमा करण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही कंपनीकडून आलेल्या बिल किंवा केवायसी अपडेट संदर्भातील संदेशाची अधिकृत संकेतस्थळ किंवा ग्राहक सेवा केंद्रातून पडताळणी करावी, असेही सांगण्यात आले आहे.

### गुंतवणुकीवर जादा परताव्याचे आमिष

**पुणे :** गुंतवणुकीवर ५ ते २० टक्के परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल २८ लाख २६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १५ मार्च ते २१ एप्रिल दरम्यान बावधन येथील डीएसके रानवारा रोड परिसरातील व्हिवा हॉलमार्क इमारतीत घडली. या प्रकरणी १२ मे रोजी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

फिर्यादी व्यक्तीचा विश्वास संपादन करून आरोपी टीना मल्होत्रा आणि सानिका गोखले यांनी गुंतवणुकीवर मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार फिर्यादींकडून विविध टप्प्यांमध्ये २८ लाख २६ हजार रुपये घेतले. मात्र, गुंतवलेली रक्कम परत न करता तसेच कोणताही परतावा न देता आरोपींनी फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी महिलांचे संपूर्ण पत्ते अद्याप उपलब्ध नसून त्यांना अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकरे करीत आहेत.

### गिफ्ट कार्डच्या नावाखाली फसवणूक

**पिंपरी :** हिंजवडी येथे ऑनलाइन गिफ्ट कार्ड खरेदीच्या बहाण्याने एका व्यक्तीची तब्बल २ लाख रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार ३ मे ते ७ मे दरम्यान घडला. आरोपीने फिर्यादी यांच्या मोबाईल आणि बँक खात्याशी संबंधित माहितीचा गैरवापर करून "बुक माय शो गिफ्ट कार्ड"च्या माध्यमातून ऑनलाइन व्यवहार केले. फिर्यादी यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्डद्वारे विविध ट्रान्झॅक्शन केले. या माध्यमातून आरोपीने एकूण २ लाख रुपये ऑनलाईन काढून घेतल्याचे समोर आले आहे. फसवणुकीची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# महापालिकेच्या प्रभाग समित्यांची पुनर्रचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनिक कामकाजात अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी तसेच तत्पर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यमान ८ प्रभाग समित्यांची पुनर्रचना करण्यात आली असून आता एकूण १० प्रभाग समित्या अर्थात क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला ऐतिहासिक किल्ल्यांची नावे देण्यात आली आहेत. वाढती लोकसंख्या, विस्तारित भौगोलिक कार्यक्षेत्र आणि प्रशासनिक गरजांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ नुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची स्थापना करण्याचे प्रावधान आहे. त्यानुसार १३ मार्च रोजी झालेल्या महापालिका सभेत विद्यमान ८ प्रभाग समित्यांची पुनर्रचना करून १० प्रभाग समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये ३२ निवडणूक प्रभागांची विभागणीदेखील नव्या प्रभाग समित्यांनुसार करण्यात आली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### दुचाकी अपघातात बँक कर्मचाऱ्याचा मृत्यू

**शिरूर :** न्हावरे-निर्वी रस्त्यावर झालेल्या दुचाकी अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. मृत महिलेचे नाव ऋतुजा विनय शिळीमकर (वय २९, रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर) असे आहे. त्या न्हावरे येथील बँकेत कॅशियर म्हणून कार्यरत होत्या. याबाबत राजेंद्र बहिरट यांनी न्हावरे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी अपघाताची नोंद केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी बँकेची सुट्टी झाल्यानंतर ऋतुजा शिळीमकर या आपल्या दुचाकीवरून मांडवगण फराटा येथील घरी जात होत्या. निर्वी गावाजवळ सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्यांचा अपघात झाला. स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्यांना जखमी अवस्थेत न्हावरे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

### भाडेकरूची माहिती न दिल्याने गुन्हा

**उरुळी कांचन :** पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून भाडेकरूची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात न दिल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी एका घरमालकावर कायदेशीर कारवाई केली आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील गट क्रमांक २०३ मधील गोल्डन नेस्ट सोसायटी, प्लॉट क्रमांक १९ येथे करण्यात आली. नवनाथ काळूराम दिवेकर (रा. वरवंड, ता. दौंड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या घरमालकाचे नाव आहे. याबाबत दहशतवाद विरोधी शाखा, पुणे ग्रामीण येथे नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार निलेश बाळासाहेब कदम यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार घरमालकांनी आपल्या भाडेकरूंची संपूर्ण माहिती संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक आहे.

---

**साखर सहसंचालक कार्यालयाने दिल्या कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना**

# राहुल कुल यांच्या भीमा सहकारीवर प्रशासक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भीमा सहकारी साखर कारखानाच्या प्रशासकीय कामकाजासाठी जिल्हा उपनिबंधक (पुणे ग्रामीण) यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक नीलीमा गायकवाड यांनी १२ मे रोजी यासंदर्भातील अंशतः बदल आदेश जारी केले. हे आदेश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अपीलातील निर्णय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार काढण्यात आले आहेत.




मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी दिलेल्या आदेशानुसार, भीमा कारखान्याच्या प्रशासक समितीची पुनर्रचना ७ मेपासून एका आठवड्यात पूर्ण करण्यास सांगण्यात आले आहे. त्यानंतर पुढील दोन आठवड्यांत कारखान्याच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. यासंदर्भात आवश्यक प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना साखर सहसंचालक कार्यालयाने दिल्या आहेत. भीमा कारखान्याचे अध्यक्ष भाजप आमदार राहुल कुल होते. कारखान्याच्या २०१९ ते २०२४ या कालावधीतील संचालक मंडळाच्या निवडणुकांसाठी एकूण ४९ हजार ४७५ पात्र सभासदांनुसार अंदाजे ६० लाख ११ हजार ४७५ रुपयांचा निवडणूक निधी आवश्यक होता. मात्र, त्यापैकी केवळ २० लाख रुपये जमा करण्यात आले होते.

निवडणुकीसाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने आणि संचालक मंडळाची मुदत संपल्याने, पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक नीलीमा गायकवाड यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी संचालक मंडळ बरखास्त केले होते. तसेच कारखान्याचे प्रशासन पाहण्यासाठी तीन सदस्यीय प्रशासकीय समिती नेमण्यात आली होती. या आदेशाविरोधात शेतकरी तुकाराम ताकवणे यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे अपील दाखल केले होते. अपील क्रमांक २४०/२०२६ वरील निकाल देताना सहकार मंत्र्यांनी ७ मे रोजी प्रादेशिक साखर सहसंचालकांचा २२ एप्रिलचा आदेश रद्द केला.


मंत्र्यांनी निरीक्षण नोंदवताना म्हटले की, प्रशासकीय मंडळावर नियुक्त करताना पात्र सभासदांची नियुक्ती करणे अपेक्षित होते. मात्र, तक्रार करणाऱ्या व्यक्तींनाच विहित प्रक्रिया न पाळता प्रशासकीय मंडळावर नेमण्यात आले. ही बाब कायद्यातील तरतुदींशी विसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले. सहकार मंत्र्यांच्या निर्णयाला वसंतराव साळुंखे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया दोन आठवड्यांत सुरू करण्याचे आदेश दिले. या पार्श्वभूमीवर प्रशासकपदी प्रकाश जगताप यांच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मात्र, यासंदर्भात प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.

अपील निकालात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी साखर सहसंचालक नीलीमा गायकवाड यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर निरीक्षण नोंदवले. प्रशासकीय मंडळ नेमताना संबंधित सदस्यांची पात्रता-अपात्रता तपासण्याची प्रक्रिया न पाळल्याने प्रशासनिक निर्णय कायदेशीरदृष्ट्या त्रुटीपूर्ण ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे, संचालक मंडळ बरखास्त करण्याचा निर्णय योग्य असला तरी प्रशासकीय समिती नियुक्तीची प्रक्रिया त्रुटीपूर्ण असल्याचे नमूद करत पूर्वीचा आदेश रद्द करण्यात आला.

---

## गडकरी यांच्याकडे पालखी महामार्गावर स्थानिकांसाठी टोलमाफीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जेजुरी :** केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाची पाहणी केली. यावेळी जेजुरी येथे स्थानिक नागरिकांना टोलमाफी देण्याची मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, गडकरी यांनी खासगी बसमधून हडपसर ते पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाची पाहणी केली. सासवड-जेजुरी मार्गावरील बेलसर फाटा येथील टोल नाक्यालाही त्यांनी भेट दिली. यावेळी स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी पुरंदर तालुक्यातील रहिवाशांना टोलमधून सूट द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

जेजुरी येथे श्री मार्तंड देवसंस्थान चे प्रमुख विश्वस्त विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे आणि पोपट खोमणे यांनी खंडोबा देवाची पगडी आणि प्रतिमा देऊन गडकरी यांचा सन्मान केला. तसेच भाजपाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती भेट देण्यात आली. या प्रसंगी अशोक टेकवडे, सचिन पेशवे, अलका शिंदे, हेमंत सोनवणे, सचिन लंबाते, सदानंद बारभाई, शिवाजी बारसुडे तसेच चारुदत्त इंगुले उपस्थित होते.

आळंदी ते पंढरपूर हा मार्ग संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. वारकरी बांधवांच्या सोयीसाठी या राष्ट्रीय महामार्गाचा विकास करण्यात आला असून, बेलसर फाटा येथील टोलमुळे स्थानिक नागरिकांना आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

---

## लाखणगाव आरोग्य उपकेंद्र सुरू होणार




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लाखणगाव येथे मंजूर करण्यात आलेले प्राथमिक आरोग्य उपकेंद्र लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती पंचायत समिती सदस्य अंकिता अनिल वाळूंज यांनी दिली.

माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रयत्नांतून सुमारे दोन वर्षांपूर्वी या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला मंजुरी मिळाली होती. उपकेंद्राच्या इमारतीचे काम सुरू झाले असले, तरी गेल्या दोन वर्षांपासून काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने स्थानिक ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त केली जात होती.

या पार्श्वभूमीवर अंकिता वाळूंज यांनी ग्रामस्थांसमवेत उपकेंद्राची पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. उपकेंद्राचे काम लवकर पूर्ण करून ते ग्रामस्थांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी मनोज रोडे उपस्थित होते.

हे आरोग्य उपकेंद्र सुरू झाल्यानंतर लाखणगाव परिसरातील नागरिकांना उपचारांसाठी लोणी, धामणी किंवा पारगाव येथे जावे लागणार नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार असल्याचेही अंकिता वाळूंज यांनी स्पष्ट केले.

---

## सोहळ्याचा पालखी विठोबा मंदिरातच मुक्काम

**संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याबाबत अधिकृत घोषणा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पुण्यातील मुक्कामाबाबत सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला असून, यंदाही पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर येथेच होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आळंदी देवस्थान आणि पालखी सोहळा मालक यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.



पालखी सोहळ्याचे प्रमुख व देवस्थानचे विश्वस्त राजेंद्र उमाप यांनी सांगितले की, पुणे जिल्हाधिकारी प्रशासनाने सेवा-सुविधा, रस्ते रुंदीकरण, अतिक्रमण हटविणे आणि भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत लेखी हमी दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पत्रकार परिषद आळंदीतील देवस्थान भक्त निवास येथे पार पडली. यावेळी भावार्थ देखणे, चैतन्य महाराज लोंढे, राजेंद्र आरफळकर, रोहिणी पवार, मुरलीधर मोहोळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

देवस्थानकडून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार, ८ जुलै २०२६ रोजी आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथून हरिनामाच्या गजरात पालखी सोहळ्याचे प्रस्थान होईल. त्यानंतर ९ व १० जुलै रोजी पुण्यातील भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर येथे दोन दिवस मुक्काम असेल.

पालखी मार्गावरील अतिक्रमण हटविणे, रस्त्यांचे रुंदीकरण, विद्युत खांबांचे स्थलांतर आणि भाविकांसाठी सुरक्षित व सुस्थितीतील मार्ग तयार करण्याचे काम प्रशासनाने हाती घेतले आहे. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यासंदर्भात देवस्थानला लेखी हमीपत्र दिल्याचे सांगण्यात आले. महापालिकेकडून पालखी विठोबा मंदिर परिसरातील जागा भूसंपादन, मंदिर परिसर विस्तार आणि भविष्यातील आराखड्याबाबतही नियोजन सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

पुण्यातील मुक्काम बदलण्याबाबत विविध मागण्या पुढे आल्याने गेल्या दोन महिन्यांपासून प्रशासन, देवस्थान, दिंडी प्रमुख आणि वारकरी संघटनांमध्ये सातत्याने चर्चा सुरू होती. अखेरीस सर्व संबंधित घटकांमध्ये सहमती झाल्यानंतर पूर्वीचा मुक्काम कायम ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

या निर्णयामुळे वारकरी संप्रदायात समाधान व्यक्त करण्यात येत असून, पुण्यातील पालखी मुक्कामाच्या ठिकाणाबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर झाला आहे.

---

## सणसर येथील ब्रिटिशकालीन पूल ढासळू लागला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** बारामती-इंदापूर मार्गावरील सणसर येथील निरा डावा कालव्यावरील ब्रिटिशकालीन पूल ढासळू लागल्याने वाहनचालक आणि वारकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, येथे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



सणसर येथील जलसंपदा कार्यालयाजवळ असलेल्या या पुलावरून बारामती-इंदापूर मार्गावरील मोठ्या प्रमाणातील वाहतूक सुरू असते. दुचाकी, चारचाकी वाहनांसह अवजड वाहनांचीही सतत ये-जा सुरू असते. विशेषतः साखर कारखान्यांच्या गाळप हंगामात याच पुलावरून ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणावर केली जाते.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलावरील लोखंडी संरक्षक कठडे तुटून कालव्यात पडले आहेत. पुलाच्या कडांवरील दगडही ढासळून खाली पडत असून, दोन्ही बाजूंना खड्डे निर्माण झाले आहेत. अवजड वाहनांच्या भारामुळे पुल अधिक खचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हा पूल ब्रिटिशकालीन असल्याने त्याची आयुर्मर्यादा संपल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळाही याच मार्गाने जात असल्याने वारकऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत सदस्य अभय निंबाळकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. "पुलाचे लोखंडी कठडे अनेक महिन्यांपासून कालव्यात पडून आहेत. पुल खालच्या बाजूनेही ढासळत आहे. मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी तातडीने नवीन पूल उभारण्याची मागणी केली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

---

## तुटलेल्या विजेच्या तारेचा शॉक लागून महिलेचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गावाच्या शिवारात शेतात तुटून पडलेल्या विजेच्या तारेचा शॉक लागून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृत महिलेचे नाव संगीता बाबाजी तिकुळे (वय ३०) असे आहे. त्या धनगर मेंढपाळ कुटुंबातील असून मूळच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील गाजीपूर येथील रहिवासी होत्या. त्यांचे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून थोरांदळे परिसरात वास्तव्यास आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी संगीता तिकुळे यांनी कुटुंबीयांना जेवण दिल्यानंतर शेजारील विहिरीवर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुऊन परत येत असताना शेतातील गवतात विजेची तार तुटून पडलेली होती. गवत दाट असल्याने ती त्यांच्या लक्षात आली नाही. तारेचा त्यांच्या गुडघ्याला स्पर्श होताच त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला आणि त्या जागीच कोसळल्या. घटनेची माहिती मिळताच संदीप टेमगिरे, वैशाली टेमगिरे, अमर बारवकर तसेच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत संगीता तिकुळे यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर तुटलेल्या विजेच्या तारांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विजेच्या धोकादायक तारा वेळेत दुरुस्त कराव्यात आणि वीज यंत्रणेची नियमित पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

## राष्ट्रीय मिलिटरी स्कूल बेंगळुरूसाठी देवांश कापडी याची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** देवांश गणेश कापडी या विद्यार्थ्याने ऑल इंडिया सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत राष्ट्रीय मिलिटरी स्कूल बेंगळुरू येथे प्रवेश मिळवला आहे. देवांश हा डी.जी. वळसे पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी आहे.



देशभरातून केवळ ३६५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये देवांशने स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे या निवडीत फक्त ३६ नागरी (सिव्हिलियन) विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येतो. राष्ट्रीय मिलिटरी स्कूल या भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयांतर्गत चालवल्या जाणाऱ्या निवासी शाळा असून येथे इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि सैनिकी दृष्टिकोन विकसित करण्यावर या शाळांमध्ये विशेष भर दिला जातो.

सध्या भारतात हिमाचल प्रदेशातील चैल, राजस्थानमधील अजमेर आणि ढोलपूर, तसेच कर्नाटकातील बंगळुरू आणि बेळगाव येथे या पाच आरएमएस शाळा आहेत.या शाळांची स्थापना १९२५ मध्ये झाली असुन या शाळेत इयत्ता ६ वी आणि ९ वी साठी प्रवेश दिला जातो. या शाळांची स्थापना १९२५ मध्ये करण्यात आली होती. सीईटी सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाते. येथे इंग्रजी माध्यमातून शिक्षणासोबत एमसीसी प्रशिक्षण, क्रीडा शिक्षण आणि नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाते.

देवांशने राष्ट्रीय मिलिटरी स्कूल प्रवेश परीक्षेत २५० पैकी १३८ गुण मिळवले, तर ऑल इंडिया सैनिक स्कूल परीक्षेत ३०० पैकी तब्बल २७० गुण मिळवत विशेष यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल परिसरातून त्याचे कौतुक होत आहे.

देवांशची आई अश्विनी कापडी-लबडे या भारतीय सैन्य दलातील सीमा सुरक्षा दलात कार्यरत आहेत, तर वडील गणेश कापडी हे पुण्यातील बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत आहेत. घरातून लाभलेल्या सैनिकी वारशामुळे भविष्यात देशसेवेसाठी जबाबदार अधिकारी बनण्याची इच्छा देवांशने व्यक्त केली आहे.

---

**ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी**

# साखर कारखान्यांकडे एफआरपीचे १,३०३ कोटी थकीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यातील २०२५-२६ चा ऊस गाळप हंगाम संपत आला असतानाही अनेक साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना देय असलेली एफआरपी (रास्त आणि किफायतशीर किंमत) पूर्णपणे अदा केलेली नसल्याचे समोर आले आहे. साखर आयुक्तालयाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अहवालानुसार राज्यातील ९६ साखर कारखान्यांकडे तब्बल १,३०३ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये



तीव्र नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

साखर आयुक्तालयाने थकीत एफआरपीबाबत संबंधित कारखान्यांच्या सुनावण्या घेतल्या असून, रक्कम भरण्यासाठी काही कारखान्यांना १८ मे तर मोठी थकबाकी असलेल्या कारखान्यांना २० मेपर्यंतची मुदत दिली आहे. या "तारीख पे तारीख" धोरणामुळे आयुक्तालय कारखानदारांबाबत नरमाईची भूमिका घेत असल्याची टीका शेतकरी वर्तुळातून होत आहे. राज्यातील अनेक शेतकरी लग्नसराई, शेतीखर्च, बँक कर्जफेड आणि दैनंदिन गरजांसाठी एफआरपीच्या पैशांची प्रतीक्षा करत आहेत. मात्र वेळेत रक्कम मिळत नसल्याने आर्थिक अडचणी वाढत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

साखर कारखान्यांकडून साखरेला कमी मागणी असल्याचा आणि आर्थिक जुळवाजुळव सुरू असल्याचा दावा केला जात आहे. कारखाने शेतकऱ्यांबरोबरच्या करारानुसार टप्प्याटप्प्याने रक्कम देत असल्याचेही सांगितले जात आहे. साखर आयुक्तालयातील सूत्रांच्या माहितीनुसार, ऊस तोडणी आणि वाहतूक खर्चासह एकूण देय एफआरपी ४० हजार ३३९ कोटी रुपये इतकी होती. त्यापैकी ३९ हजार ३६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले असून उर्वरित १,३०३ कोटी रुपये अद्याप बाकी आहेत. राज्यातील ११३ साखर कारखान्यांनी मात्र १०० टक्के एफआरपी अदा केली आहे.

डॉ. संजय कोलते यांच्या उपस्थितीत सोमवारी ३९ साखर कारखान्यांच्या सुनावण्या पार पडल्या. नोटीस दिल्यानंतर १५ कारखान्यांनी पूर्ण एफआरपी अदा केल्याचे स्पष्ट झाले. मात्र उर्वरित कारखान्यांनी आणखी मुदत मागितल्याने त्यांना अंतिम तारीख देण्यात आली आहे. सुनावणीत दिलेल्या आश्वासनानंतरही एफआरपी न भरल्यास संबंधित कारखान्यांवर महसुली वसुली प्रमाणपत्र अंतर्गत जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशारा साखर आयुक्तांनी दिला आहे.

पूर्वी एफआरपीच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेणाऱ्या शेतकरी संघटनांची धार सध्या बोथट झाल्याची चर्चा साखर क्षेत्रात सुरू आहे. ठोस आंदोलनाचा दबाव नसल्याने कारखानदार आणि प्रशासनावर अपेक्षित ताण निर्माण होत नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे येत्या १८ ते २० मेदरम्यान थकीत रक्कम प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होते का, याकडे राज्यातील ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

---

## बिबट्याच्या हल्ल्यात दीड वर्षांची घोडी ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव-दत्तात्रयनगर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात दीड वर्षांच्या घोडीचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना परिसराच्या पूर्व बाजूस संतोष बबन ढोबळे यांच्या शेतात मेंढपाळ मुक्कामी होते. गुरुवारी (दि.१४) पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास बिबट्याने बापू शिंदे आणि बबन शिंदे यांच्या मालकीच्या दीड वर्षांच्या घोडीवर हल्ला केला. या हल्ल्यात घोडीचा जागीच मृत्यू झाला.

मोरगाव सुपा येथील शिंदे बंधू गेल्या अनेक वर्षांपासून पारगाव परिसरात मेंढपाळ व्यवसायासाठी वास्तव्यास आहेत. या घटनेमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेनंतर वनविभागाच्या पूजा कांबळे आणि अशोक जाधव यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. तसेच पारगाव-धामणी बीटच्या वनपाल निलम चव्हाण यांनाही घटनेची माहिती देण्यात आली. माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे आणि सामाजिक कार्यकर्ते बजरंग देवडे यांनी पीडित कुटुंबाला नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

## सारांश वृत्त

### मिझोराम आले अभियानाला प्रारंभ

**आयझॉल :** केंद्र सरकारने ईशान्येकडील राज्यात आल्याची लागवड आणि मूल्य साखळी विकासासाठी १८९.७९ कोटी रुपयांचा अभिसरण-आधारित उपक्रम, मिझोराम जिंजर मिशन सुरू केले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. केंद्रीय डोनेर मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आणि मिझोरामचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी व्हर्च्युअल पद्धतीने संयुक्तपणे या प्रकल्पाचे अनावरण केले.

### एमएसपी वाढीमुळे शेतकऱ्यांना फायदा

**चंदीगड** : भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांनी गुरुवारी १४ खरीप पिकांच्या किमान आधारभूत किमतीतील (एमएसपी) वाढीचे स्वागत केले आणि सांगितले की, यामुळे पंजाबच्या शेतकऱ्यांसह शेतकरी समुदायाला मोठा फायदा होईल. केंद्र सरकारने बुधवारी २०२६-२७ च्या खरीप विपणन हंगामासाठी धानाच्या किमान आधारभूत किमतीत ७२ रुपयांनी वाढ करून ती प्रति क्विंटल २,४४१ रुपये करण्याची घोषणा केली, तर आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पीक विविधतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कडधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे.

### आसाममधून ऊदाची पहिली खेप निर्यात

**गुवाहाटी** : आसामने २.३५ कोटी रुपये किमतीच्या अगरवुड चिप्सची पहिली खेप सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीला निर्यात केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अगरवुड, ज्याला ऊद म्हणूनही ओळखले जाते, हा जगातील सर्वात मौल्यवान सुगंधी कच्च्या मालांपैकी एक आहे आणि आखाती प्रदेश, युरोप व आग्नेय आशियामध्ये याचा वापर आलिशान अत्तरे, धूप, सौंदर्यप्रसाधने आणि पारंपरिक उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. ऑल आसाम अगरवुड प्लांटर्स अँड ट्रेडर्स असोसिएशनने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ही खेप राज्याच्या कृषी-वन अर्थव्यवस्थेतील एक "महत्त्वाचा टप्पा" आहे, कारण ही "अगरवुड चिप्सची पहिली कायदेशीर निर्यात" आहे.

### काँग्रेसमधील पेचप्रसंगावर ९ दिवसांनंतर मार्ग

# केरळच्या मुख्यमंत्रीपदी व्ही. डी. सतीशन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अखेरच्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडी आणि तीव्र अंतर्गत चर्चेनंतर काँग्रेसने मंगळवारी ज्येष्ठ नेते व्ही. डी. सतीशन यांची केरळच्या पुढील मुख्यमंत्रीपदी निवड जाहीर केली. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने नवी दिल्लीत अधिकृत घोषणा करत दीर्घकाळ सुरू असलेल्या तिढ्यावर पडदा टाकला.

काँग्रेसच्या केरळ प्रभारी दीपा दास मुन्शी यांनी एआयसीसीचे महासचिव जयराम रमेश, निरीक्षक मुकुल वासनिक आणि अजय माकन यांच्या उपस्थितीत सतीशन यांच्या नावाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, ७ मे २०२६ रोजी तिरुवनंतपुरम येथे झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नव्या नेत्याची निवड करण्याचे अधिकार काँग्रेस अध्यक्षांना देण्यात आले होते. यानंतर काँग्रेस अध्यक्षांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते, एआयसीसी निरीक्षक, नवनिर्वाचित आमदार, खासदार तसेच केरळमधील वरिष्ठ नेत्यांशी विस्तृत चर्चा केली. त्या चर्चेनंतर व्ही. डी. सतीशन यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड करण्यात आल्याचे दास मुन्शी यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्रीपदासाठी व्ही. डी. सतीशन, रमेश चेन्नीथला आणि पक्षाचे महासचिव (संघटन) के. सी. वेणुगोपाल यांच्यात चुरशीची स्पर्धा होती. अखेर पक्ष नेतृत्वाने सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्यानंतर केरळमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

घोषणेच्या वेळी सतीशन हे तिरुवनंतपुरममधील विरोधी पक्षनेत्यांच्या अधिकृत निवासस्थानी उपस्थित होते. निर्णय जाहीर होताच राज्यातील विविध भागांत फटाके फोडून आणि मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. एर्नाकुलम जिल्ह्यातील परवूर मतदारसंघात विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सतीशन हे २००१ पासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

के. सी. वेणुगोपाल यांनी पक्षाच्या निर्णयाचे स्वागत करत सतीशन यांचे अभिनंदन केले. नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना त्यांनी नव्या मुख्यमंत्री आणि यूडीएफ सरकारला पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली. केरळ प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष सनी जोसेफ यांनीही पक्ष कार्यकर्त्यांनी हायकमांडचा निर्णय स्वीकारल्याचे सांगितले.

मूळतः ही घोषणा तिरुवनंतपुरम येथे होणार होती. मात्र, अखेरच्या क्षणी हा निर्णय नवी दिल्लीत घेण्यात आला. सूत्रांच्या माहितीनुसार, राहुल गांधी यांनी सकाळी के. सी. वेणुगोपाल यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली होती. या बैठकीला प्रियांका गांधीही उपस्थित होत्या. पक्षातील सर्व गटांमध्ये एकमत निर्माण करण्यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. पक्ष नेतृत्वाला मुख्यमंत्री निवडीवरून उघड संघर्ष टाळायचा होता. त्यामुळे नव्या सरकारच्या सुरुवातीलाच पक्षाची एकता धोक्यात येऊ नये, यासाठी काळजीपूर्वक पावले उचलण्यात आली. नवनिर्वाचित आमदार, माजी प्रदेशाध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांशी अनेक टप्प्यांत चर्चा केल्यानंतर अखेर निर्णय घेण्यात आला.

विधानसभा निवडणूक प्रचारात आक्रमक भूमिका घेणारे आणि पिनारयी विजयन सरकारविरोधात प्रभावी नेतृत्व करणारे सतीशन हे सर्वमान्य चेहरा म्हणून पुढे आले. के. सी. वेणुगोपाल यांना अनेक काँग्रेस आमदार आणि खासदारांचा पाठिंबा होता, तर सतीशन यांना इंडियन युनियन मुस्लिम लीगसह यूडीएफमधील प्रमुख मित्रपक्षांचा पाठिंबा मिळाला होता. मात्र, अंतिम चर्चांमध्ये सतीशन समर्थक गटाने बाजी मारल्याचे बोलले जात आहे.

## निवडणूक हिंसाचार प्रकरणी ममता बॅनर्जी न्यायालयात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी गुरुवारी निवडणुकीनंतर झालेल्या कथित हिंसाचार आणि पक्ष कार्यालयांवरील हल्ल्यांप्रकरणी कलकत्ता उच्च न्यायालयात हजर झाल्या. या प्रकरणातील युक्तिवादासाठी त्या स्वतः न्यायालयात उपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले.

ममता बॅनर्जी या वकिलांचा गाऊन परिधान करून न्यायालयात पोहोचल्या. त्यांच्यासोबत तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या चंद्रिमा भट्टाचार्य आणि खासदार कल्याण बॅनर्जी उपस्थित होते. ही सुनावणी २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर झालेल्या कथित हिंसाचाराशी संबंधित आहे.

तृणमूल काँग्रेसच्या वतीने वकील शिरशान्या बंदोपाध्याय यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत पक्षाच्या कार्यालयांवर हल्ले झाल्याचा तसेच कार्यकर्त्यांवर अत्याचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याचिकेनुसार, निवडणुकांनंतर अनेक टीएमसी नेते आणि कार्यकर्त्यांना आपली घरे सोडून पळ काढावा लागला. तसेच, "तृणमूल काँग्रेसशी संबंध असल्यामुळे" अनेकांवर हल्ले करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. ही याचिका १२ मे रोजी कलकत्ता उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. सरन्यायाधीश सुजॉय पॉल आणि न्यायमूर्ती पार्थसारथी सेन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

तृणमूल काँग्रेसने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, "संपूर्ण बंगालमध्ये भाजपकडून घडवून आणण्यात आलेल्या निवडणुकीनंतरच्या हिंसाचाराशी संबंधित प्रकरणात युक्तिवाद करण्यासाठी आमच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी आज स्वतः कलकत्ता उच्च न्यायालयात दाखल झाल्या," असे पक्षाने म्हटले आहे.

## परकीय चलन उल्लंघनप्रकरणी छापेमारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ऑनलाइन गेमिंगशी संबंधित कथित परकीय चलन उल्लंघन प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गुरुवारी दिल्लीस्थित झायगार्ड टेक्नॉलॉजीज प्रा. लि. आणि तिच्या संबंधित कंपन्यांविरोधात अनेक राज्यांमध्ये शोधमोहीम राबवली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली, गुजरात, मध्य प्रदेशातील इंदूर तसेच जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे संबंधित व्यक्ती आणि कंपन्यांच्या सुमारे १४ ठिकाणी छापे टाकण्यात आले.

ही कारवाई परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) अंतर्गत करण्यात आली आहे. ईडीने या प्रकरणात कथित आर्थिक गैरव्यवहार आणि परदेशात निधी वळवण्याच्या आरोपांची चौकशी सुरू केली आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, झायगार्ड टेक्नॉलॉजीजने ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून पेमेंट एग्रीगेटर्सद्वारे मोठ्या प्रमाणात निधी गोळा केल्याची माहिती तपास यंत्रणेला मिळाली होती. हा निधी विविध संस्थांमार्फत वळवण्यात आल्याचा संशय आहे. ईडीच्या अधिकाऱ्यांनी दावा केला की, 'हॅपी इझीगो'सह काही संस्थांच्या माध्यमातून हा पैसा परदेशात पाठवण्यात आला. वॉलेट रिचार्ज आणि विमानसेवांशी संबंधित व्यवहारांच्या नावाखाली निधी विदेशात हलवण्यात आल्याचा आरोप असून, हे व्यवहार फेमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणारे असल्याचे तपास यंत्रणेचे म्हणणे आहे. ईडीच्या कारवाईबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी झायगार्ड टेक्नॉलॉजीजशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला, मात्र कंपनीकडून तत्काळ कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही. केंद्र सरकारने ऑगस्ट २०२५ मध्ये भारतात ऑनलाइन पैशांच्या जुगारावर बंदी घातली होती. ऑनलाइन गेमिंग आणि संबंधित आर्थिक व्यवहारांवर विविध तपास यंत्रणांनी लक्ष केंद्रित केले आहे.

## राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवरून भाजपचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावित पाच देशांच्या दौऱ्यावर काँग्रेसने टीका केल्यानंतर भाजपने गुरुवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून जोरदार प्रतिहल्ला चढवला. भाजपचे राष्ट्रीय माहिती व तंत्रज्ञान विभागप्रमुख अमित मालवीय यांनी राहुल गांधी यांच्या गेल्या २२ वर्षांतील ५४ परदेश दौऱ्यांचा उल्लेख करत त्यांच्या निधीच्या स्रोतांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

अमित मालवीय यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये दावा केला की, राहुल गांधी यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना किमान ५४ "शोधता येण्याजोगे" परदेश दौरे केले आहेत. इटली, लंडन, न्यूयॉर्क, बर्लिन, व्हिएतनाम, कंबोडिया, कतार, यूएई, मालदीव, बहरीन, सिंगापूर, थायलंड आणि ओमानसह अनेक देशांच्या दौऱ्यांचा त्यांनी उल्लेख केला.

मालवीय यांनी आरोप केला की, या दौऱ्यांच्या खर्चाचा तपशील सार्वजनिक करण्यात आलेला नाही. "२००४ ते २०२६ या कालावधीत राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरील खर्च अंदाजे ६० कोटी रुपये असल्याचे दिसते. मात्र, त्याच काळातील त्यांच्या फॉर्म २६ प्रतिज्ञापत्रांनुसार घोषित उत्पन्न सुमारे ११ कोटी रुपये आहे," असा दावा त्यांनी केला.

२०१५ मधील दक्षिण-पूर्व आशियाच्या दौऱ्याचा उल्लेख करत मालवीय म्हणाले, "त्या एका दौऱ्याचा अंदाजित खर्च सुमारे ४.५ कोटी रुपये होता, तर त्याच वर्षी घोषित उत्पन्न ८६.५५ लाख रुपये होते. म्हणजेच एका दौऱ्याचा खर्च वार्षिक उत्पन्नाच्या ५.२ पट होता."

या संदर्भात त्यांनी परदेशी निधी, वैयक्तिक खर्च आणि एफसीआरए नियमांचे पालन याबाबत प्रश्न उपस्थित केले. "जर परदेशी संस्थांनी या दौऱ्यांसाठी निधी दिला असेल, तर एफसीआरए कलम ६ अंतर्गत आवश्यक परवानग्या कुठे आहेत? आणि जर वैयक्तिक निधी वापरला असेल, तर त्यासंबंधीचे आयकर विवरण, परकीय चलन व्यवहार आणि लेखापरीक्षित हिशेब कुठे आहेत?" असा सवाल त्यांनी केला.

मालवीय यांनी दावा केला की, सीआरपीएफच्या १० सप्टेंबर २०२५ च्या पत्रानुसार डिसेंबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत राहुल गांधी यांनी सहा अघोषित परदेश दौरे केले.

यामध्ये इटली, व्हिएतनाम, दुबई, कतार, लंडन आणि मलेशिया या देशांचा समावेश असल्याचे त्यांनी म्हटले. मे २०२६ मध्ये ओमान दौऱ्याचाही उल्लेख समोर आल्याचा दावा त्यांनी केला.

## बंगालमधील शाळांमध्ये 'वंदे मातरम' अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील सर्व शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थनेसह 'वंदे मातरम' गायन अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या अधिकृत पत्रकानुसार, हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे.

शिक्षण संचालकांनी १३ मे रोजी शाळांच्या मुख्याध्यापकांना पाठवलेल्या पत्रात, "वर्ग सुरू होण्यापूर्वी सकाळच्या प्रार्थनेदरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम' गायले पाहिजे," असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या आदेशाचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांवर सोपवण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, सकाळच्या संमेलनाच्या सुरुवातीला 'वंदे मातरम' सादर केले जाणार आहे. तसेच, या आदेशाच्या अंमलबजावणीचा पुरावा म्हणून शाळांना व्हिडिओ रेकॉर्डिंगसह संमेलनाची नोंद ठेवण्यासही सांगण्यात आले आहे. केंद्र सरकारने 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायदा, १९७१' मध्ये दुरुस्ती करण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर लगेचच पश्चिम बंगाल सरकारने हे पाऊल उचलले आहे.

प्रस्तावित दुरुस्तीनुसार, 'वंदे मातरम' गायनात अडथळा आणणे हा शिक्षेस पात्र गुन्हा मानला जाऊ शकतो. यापूर्वी राज्यातील शाळांमध्ये प्रामुख्याने रवींद्रनाथ टागोर लिखित 'जन गण मन' हे राष्ट्रगीत गायले जात होते. आता बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम'चा समावेश झाल्याने शाळांमधील सकाळच्या संमेलनाचा कालावधी, राष्ट्रगीत आणि राष्ट्रगीताचा क्रम याबाबत शिक्षकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

### जागतिक संकटांवर सामूहिक उपायांची गरज

## भारताचे ब्रिक्स राष्ट्रांना आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** जागतिक संघर्ष, आर्थिक अस्थिरता आणि व्यापारातील वाढत्या व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर या आव्हानांना सामूहिकपणे तोंड देण्यासाठी "व्यावहारिक मार्ग" शोधण्याचे आवाहन भारताने ब्रिक्स राष्ट्रांना केले आहे. नवी दिल्लीत सुरू झालेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या दोन दिवसीय परिषदेत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी हे आवाहन केले.

रशिया, ब्राझील, इराणसह ब्रिक्स सदस्य देशांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात जयशंकर यांनी जग सध्या मोठ्या भू-राजकीय आणि आर्थिक अनिश्चिततेच्या टप्प्यातून जात असल्याचे नमूद केले.

"आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये मोठ्या उलथापालथीचा काळ सुरू आहे. सुरू असलेले संघर्ष, आर्थिक अस्थिरता तसेच व्यापार, तंत्रज्ञान आणि हवामान क्षेत्रातील आव्हाने जागतिक परिस्थिती घडवत आहेत," असे जयशंकर म्हणाले.

पश्चिम आशियातील तणाव आणि विशेषतः इराणसंदर्भातील अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने अनेक देशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

जयशंकर यांनी सांगितले की, उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्थांना आता जागतिक आव्हानांच्या काळात ब्रिक्सकडून स्थिरता आणि सहकार्याची अपेक्षा आहे. "जागतिक आणि प्रादेशिक घडामोडींवर चिंतन करण्यासोबतच परस्पर सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी व्यावहारिक मार्ग शोधण्याची ही योग्य वेळ आहे," असे ते म्हणाले. ऊर्जा, अन्न, खत आणि आरोग्य सुरक्षेच्या समस्या अनेक देशांसमोर गंभीर स्वरूपात उभ्या आहेत. त्यातच वित्तपुरवठ्याच्या मर्यादित उपलब्धतेमुळे विकसनशील देशांवरील दबाव वाढत असल्याचे जयशंकर यांनी अधोरेखित केले.

"विकासाचे प्रश्न आज केंद्रस्थानी आहेत. अनेक देश ऊर्जा, अन्न, खत आणि आरोग्य सुरक्षेच्या आव्हानांशी झुंज देत आहेत. वित्तपुरवठ्याची उपलब्धताही मर्यादित झाली आहे. अशा परिस्थितीत ब्रिक्स अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतो," असे ते म्हणाले. आर्थिक स्थैर्यासाठी विश्वासार्ह पुरवठा साखळ्या आणि वैविध्यपूर्ण बाजारपेठांची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

"आर्थिक लवचिकता वाढवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विश्वासार्ह पुरवठा साखळ्या आणि विविध बाजारपेठा महत्त्वाच्या ठरतील. या दोन्ही बाबींवर आपल्याला लक्ष केंद्रित करावे लागेल," असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

## लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणी आरोपपत्र दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लाल किल्ला परिसरातील कार बॉम्बस्फोट प्रकरणात ११ जणांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जण जखमी झाले होते. या प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेने १० आरोपींविरुद्ध ७,५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे , असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. गेल्या वर्षी १० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय राजधानीत झालेल्या उच्च-तीव्रतेच्या वाहन-आधारित स्फोटक उपकरणाच्या स्फोटामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसानही झाले.

एनआयएच्या म्हणण्यानुसार, मुख्य गुन्हेगार डॉ उमर उन नबी (मृत) यांच्यासह सर्व 10 आरोपी हे भारतीय उपमहाद्वीपमधील अल-कायदाच्या शाखा असलेल्या अन्सार गजवत-उल-हिंदशी संबंधित होते. दिल्लीतील पटियाला हाउस न्यायालयातील एनआयए विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. जून २०१८ मध्ये गृह मंत्रालयाने अल कायदा आणि त्याच्याशी संलग्न संघटनांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले.

एजन्सीने सांगितले की, त्यांच्या तपासात वैज्ञानिक आणि न्यायवैद्यक तपासणीद्वारे एका मोठ्या जिहादी कटाचा पर्दाफाश झाला आहे. तपासकर्त्यांना असे आढळून आले की, अनेक कट्टरपंथी वैद्यकीय व्यावसायिकांसह आरोपी, हा हल्ला करण्यासाठी अल कायदाच्या विचारसरणीने प्रेरित होते.

बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा, भारतीय न्याय संहिता, स्फोटक पदार्थ कायदा, शस्त्र कायदा आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

एनआयएने म्हटले आहे की, फरिदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठात वैद्यकशास्त्राचे माजी सहायक प्राध्यापक असलेले पुलवामास्थित डॉ. उमर उन नबी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावरील आरोप रद्द करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

आरोपपत्रात आमिर रशीद मीर, जसीर बिलाल वानी, डॉ मुझम्मिल शकील, डॉ अदील अहमद राथेर, डॉ शाहीन सईद, मुफ्ती इरफान अहमद वाघे, सोयाब, डॉ बिलाल नसीर मल्ला आणि यासिर अहमद दार यांचा समावेश आहे.

## ३० सप्टेंबरपर्यंत साखर निर्यातीवर बंदी

**नवी दिल्ली :** एका सरकारी अधिसूचनेनुसार, भारताने यावर्षी ३० सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने १३ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, हा आदेश टॅरिफ रेट कोटा योजनेअंतर्गत युरोपियन युनियन आणि अमेरिकेत निर्यात होणाऱ्या साखरेला लागू होत नाही. तसेच सरकार-ते-सरकार निर्यातीला आणि प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत आधीच असलेल्या मालाच्या खेपांना देखील लागू नाही.

## भगव्या उपरण्यांना परवानगी नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने सरकारी शाळांमधील हिजाबवरील बंदी रद्द केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी , मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी स्पष्ट केले की, धार्मिक चिन्हांसंदर्भातील राज्य सरकारच्या आदेशानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये भगव्या उपरण्यांना परवानगी दिली जाणार नाही.

मुख्यमंत्री म्हणाले की, हिजाब, पगडी, रुद्राक्ष आणि जानवे यांसारख्या आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या प्रथांना परवानगी देण्यात येईल. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, ज्या धार्मिक पोशाखांचा प्रचलित वापर केला जातो, त्यांना परवानगी दिली जाईल.

कर्नाटक सरकारने बुधवारी विद्यार्थ्यांना शाळांमध्ये हिजाब, पवित्र धागा, शिवधारा आणि रुद्राक्ष धारण करण्यास परवानगी देणारा आदेश पारित केला.

या आदेशाने, हिजाब विरुद्ध भगवी उपरणी वादाच्या पार्श्वभूमीवर सरकारी शाळांमध्ये हिजाबवर बंदी घालणारा भाजप सरकारचा २०२२ चा आदेश रद्द केला. विरोधी पक्षाने या निर्णयावर जोरदार टीका केली आणि याला 'तुष्टीकरणाचे राजकारण' म्हटले.

हिंदू उजव्या विचारसरणीच्या संघटनांच्या एका गटाने तर शाळांमध्ये भगवी उपरणे परिधान करण्याचा इशारा दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे की भगव्या उपरण्यांना परवानगी दिली जाणार नाही.

### चुकीची भूमिका घेतल्यास 'संघर्षाची' शक्यता

# तैवान मुद्द्यावरून जिनपिंग यांचा ट्रम्पना इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बीजिंग :** येथे सुरू झालेल्या अमेरिका-चीन शिखर परिषदेदरम्यान चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तैवानच्या मुद्द्यावर स्पष्ट इशारा दिला आहे. तैवान प्रश्न चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास दोन्ही महासत्तांमध्ये संघर्ष किंवा युद्धाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे शी यांनी ठामपणे सांगितले.

गुरुवारी बीजिंगमध्ये झालेल्या बैठकीत शी जिनपिंग यांनी तैवान हा चीन-अमेरिका संबंधांतील सर्वात संवेदनशील मुद्दा असल्याचे स्पष्ट केले. चीनच्या सरकारी वृत्तवाहिनी सीसीटीव्हीनुसार, "तैवान प्रश्न चुकीच्या पद्धतीने हाताळला गेला, तर दोन्ही देश संघर्षाच्या धोकादायक टप्प्यावर पोहोचू शकतात," असा इशारा त्यांनी दिला. चीन दौऱ्यावर पोहोचलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी शी जिनपिंग यांचे कौतुक करत त्यांना "महान नेता" आणि "मित्र" संबोधले. अमेरिका आणि चीन एकत्रितपणे उज्ज्वल भविष्य घडवू शकतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बीजिंगमधील 'ग्रेट हॉल ऑफ द पीपल' येथे ट्रम्प यांचे भव्य स्वागत करण्यात आले. लष्करी बँड, तोफांची सलामी आणि शेकडो शाळकरी मुलांच्या उपस्थितीत रेड कार्पेट अंथरून त्यांचे स्वागत करण्यात आले. ट्रम्प यांनी या समारंभाचा आनंद घेत "अमेरिका-चीन संबंध पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होतील," असे म्हटले. मात्र, शी जिनपिंग यांनी अधिक सावध भूमिका घेत दोन्ही देशांनी प्रतिस्पर्धी नव्हे तर भागीदार म्हणून काम करावे, असे आवाहन केले. त्यांनी प्राचीन ग्रीक राजकीय सिद्धांत 'थुसिडायडिस ट्रॅप'चा संदर्भ देत उदयोन्मुख आणि प्रबळ महासत्तांमधील संघर्षाचा धोका अधोरेखित केला. "सहकार्य दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरते, तर संघर्ष दोघांचेही नुकसान करतो," असे शी म्हणाले.

२०१७ नंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच बीजिंग दौरा आहे. मात्र, या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर व्यापार युद्ध, तैवान, कृत्रिम बुद्धिमत्ता, दुर्मिळ मृदा निर्यात आणि इराण या विषयांवरून दोन्ही देशांमध्ये गंभीर मतभेद कायम आहेत. तैवान हा या चर्चेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. अमेरिका अधिकृतरीत्या 'वन चायना' धोरण मान्य करत असली तरी तैवानला संरक्षणासाठी शस्त्रपुरवठा करते. चीनने तैवानला आपला भाग असल्याचा दावा कायम ठेवला असून आवश्यक असल्यास बळाचा वापर करण्याचाही इशारा दिला आहे. सोमवारी ट्रम्प यांनी तैवानला होणाऱ्या अमेरिकन शस्त्रविक्रीबाबत शी जिनपिंग यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले होते. अमेरिकेच्या पारंपरिक भूमिकेपासून हे मोठे विचलन मानले जात आहे. इराणचाही मुद्दा चर्चेत महत्त्वाचा ठरला. इराणवर अमेरिकेने निर्बंध लादले असतानाही चीन मोठ्या प्रमाणावर इराणी तेलाची खरेदी करत आहे. ट्रम्प यांनी इराणबाबत शी जिनपिंग यांच्यासोबत "सविस्तर चर्चा" होणार असल्याचे सांगितले. मात्र, "इराण प्रश्नावर बीजिंगच्या मदतीची गरज नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले.

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी चीनने इराणला पर्शियन आखातातील कारवायांपासून रोखण्यासाठी अधिक सक्रिय भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.